लोकमत ५-५-१९.

# विरारच्या गुन्हेगारावर एमपीडीएअंतर्गत कारवाई

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** विरार परिसरातील सराईत गुन्हेगारावर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी शनिवारी दिली आहे.

मिरा भाईंदर - वसई विरार आयुक्तालयातील सराईत गुन्हेगार मस्तान उस्मान शेख याने विरार पोलिस ठाणे हद्दीत व परिसरात गुन्हेगारी व धोकादायक कृत्यांनी दहशत निर्माण केली होती. त्या आधारे परिसरातून तो बांधकाम व्यावसायिक व इतर व्यापाऱ्यांकडून पैसे उकळत होता. इतर साथीदारांसह दहशतीसाठी मारामाऱ्या करणे, महिलांचा विनयभंग करणे, सरकारी नोकरावर हल्ला करून दुखापत करणे, ॲसिड हल्ला करून जबर दुखापत करणे तसेच बेकायदेशीररीत्या शस्त्रे जवळ बाळगून लोकांना धमकावणे, खुनाचा प्रयत्न करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे अपराध केले असून त्याच्याविरुद्ध एकूण सहा गुन्हे दाखल आहेत.




## पहिल्यांदाच अशी कारवाई

१ विरार पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी या गुन्हेगाराचा पूर्व इतिहास व सर्व माहिती संकलित करून एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव पोलिस उपायुक्तांमार्फत सादर केला होता.

२ **या प्रस्तावाचे अवलोकन करून ही धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री पटल्याने त्याच्याविरोधात पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्धतेचे आदेश पारित केले आहेत.**

३ पोलिस आयुक्तालयामध्ये प्रथमच अशा प्रकारची स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. यापुढे देखील आयुक्तालयामध्ये अशा प्रकारे सराईत गुन्हे करणाऱ्या इसमांविरुद्ध कडक कारवाई केली जाणार आहे.

## आचोळेत घरफोडी

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** गाळा नगरच्या साईलीला अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सुनीता मेकवान (४६) यांच्या घरी चोरी झाली आहे. त्यांचे पती एडविन आणि त्यांचा मुलगा ॲलेक्स हे दोघे रूमच्या सेफ्टी डोअरची कडी बंद करून मुख्य दरवाजा अर्धवट उघडा ठेवून झोपले होते. चोरट्याने घरात प्रवेश करून कपाटातील सोन्याची चेन, दोन मोबाईल, रोख रक्कम असा एकूण ५२ हजार ९५० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. आचोळे पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

## तलावात बुडून मुलीचा मृत्यू




**नालासोपारा :** टाकीपाड्याच्या डांगेवाडी येथील बंगालीपुरा परिसरात राहणाऱ्या रुखय्या (९) या अल्पवयीन मुलीचा तलावाच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे. ती दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास डांगेवाडीच्या पाठीमागील तलावाच्या ठिकाणी खेळत होती. खेळताना ती तलावात पडल्याने पाण्यात बुडून तिचा मृत्यू झाला आहे. नालासोपारा पोलिसांनी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## आचोळ्यात केली नोकराने चोरी

**नालासोपारा :** वसंत नगरी येथील ट्रिन्टी गार्डन या सोसायटीत राहणाऱ्या रंजना सिंग (४६) यांच्या घरी २२ ते २५ एप्रिलच्या दरम्यान नोकराने चोरी केली आहे. त्यांच्या घरी संशयित महिला सरिता उर्फ दुलारीदेवी ही मागील दीड महिन्यापासून साफसफाईचे काम करत आहे. तिने त्यांच्या बेडरूममधील कपाटाच्या ड्राव्हरमधील २ लाख ९७ हजार ८०१ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले अशी तक्रार केली आहे. याप्रकरणी आचोळे पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## वालीव पोलिसांनी पकडला गांजा



**नालासोपारा :** वसईच्या धुमाळ नगर परिसरातून वालीव पोलिसांनी शुक्रवारी सकाळी गांजा पकडला आहे. आरोपी मोहम्मद फैजान खान (२२) हा अवैधरीत्या वसईच्या धुमाळनगरमधील ओम साई रेस्टॉरंटसमोरील रोडवर त्याच्या पाठीवरील बॅगमधून एका प्लास्टिकच्या पिशवीतून २५ हजार रुपये किमतीचा २ किलो गांजा हा अमली पदार्थ बेकायदेशीररीत्या बाळगलेला आढळला. पोलिसांनी गांजासह १० हजारांचा मोबाइल आणि ७०० रुपयांची रोख रक्कम असा मुद्देमाल हस्तगत केला आहे. पोलिस हवालदार किरण म्हात्रे यांनी तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## नायगावमध्ये तलवार हस्तगत

**नालासोपारा :** नायगावच्या डॉन बास्को शाळेसमोरील न्यू गिरणार इमारतीच्या फ्लॅट नंबर ४३, के/१५ मधून पोलिसांनी तलवार हस्तगत केली आहे. आरोपींनी ही तलवार स्वतःच्या जवळ ठेवून समाजात दहशत पसरवण्यासाठी तलवारी सोबतचे फोटो स्वतःच्या सोशल मीडियावर पोस्ट केले आहेत. या आरोपीला तलवार बेकायदेशीररित्या पुरविणाऱ्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अंमलदार चेतन ठाकरे (३३) यांनी शुक्रवारी तक्रार देऊन धर्मेंद्र मिश्रा (४८), शिरीष मिश्रा (२१), ओमकार सिंग (१९) आणि संगम पांडे या चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## लाखोंची वीजचोरी; दोघांवर गुन्हा

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** विरारच्या स्टार अपार्टमेंटमध्ये नऊ वर्षांपासून वीजचोरी करणाऱ्या दोघांविरुद्ध शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे. बिस्मिल्ला खान आणि हसन शेख यांनी वीज मीटरमध्ये फेरफार करून ६ लाख १७ हजाराची वीजचोरी करून महावितरणचे नुकसान केले आहे. सहाय्यक अभियंता कुणाल पिंपळे (३९) यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# आयपीएलवर सट्टा लावणे तिघांना पडले महागात

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** चिखल डोंगरी रोडवरील मोतीग्रीन सोसायटीच्या बंगलो नंबर २२ येथे आयपीएलवर सट्टा लावणाऱ्या तिघांना अर्नाळा पोलिसांनी पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

अश्विनीकुमार पांडे (२६), कृष्णा यादव (३६) आणि गौरव भाटिया (२१) या तिघांनी मोबाइलचा वापर करून वेबसाईटवरून १८ ते २५ एप्रिल दरम्यान वेगवेगळ्या लोकांना मॅचवर क्रिकेट बेटिंग खेळण्याकरिता आयडी व पासवर्ड दिला. त्यावरून क्रिकेट बेटिंग खेळताना व खेळवताना आढळले. त्यांच्याकडील मोबाइलचा क्रिकेट बेटिंग जुगाराकरिता गैरवापर केला व आर्थिक फायद्यासाठी बेटिंग केले. अर्नाळा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तिघांचे ६० हजारांचे तीन मोबाईल हस्तगत केले आहेत.

CamScanner

लोकमत ५-५-२०

# पाहणी करून धोकादायक इमारतींची यादी जाहीर करावी

## मीरा-भाईंदर पालिका आयुक्तांचे प्रभाग अधिकाऱ्यांना निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** पावसाळ्यात शहरातील महत्त्वाचे रस्ते, ठिकाणे येथे पाणी तुंबू नये किंवा दुर्घटना घडू नये, याकडे लक्ष द्यावे, तसेच पावसाळ्यापूर्वीच शहरातील धोकादायक इमारतींची पाहणी आणि वर्गीकरण करून त्यांची यादी जाहीर करावी आणि त्याबाबत दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश मीरा भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मीरा भाईंदर महापालिका आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन तथा मान्सूनपूर्व आढावा बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त रवी पवार, कल्पिता पिंपळे व सचिन बांगर, मुख्यालय स.पोलिस आयुक्त विजयकुमार मराठे, वाहतूक शाखेचे पो.नि.देवीदास हंडोरे, उत्तन सागरीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दादाराम करांडे, शहर अभियंता दीपक खांबित, नितीन मुकणे, शरद नानेगावकर, प्रभाग समिती अधिकारी, महामार्ग प्राधिकरण, गॅसचे प्रतिनिधी, मेट्रो ठेकेदार आदी उपस्थित होते.



मीरा-भाईंदर महापालिकेने पोलिसांसह विविध विभागांची बैठक घेऊन आपत्ती व्यवस्थापनाबाबत चर्चा करून योग्य उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

### कुठल्याही परिस्थितीत रस्त्यावर खड्डा चालणार नाही

**१** सध्या सुरू असलेल्या स्थापत्यविषयक कामांची स्थिती जाणून घेत ही कामे आठवड्याचे सात दिवस आणि २४ तास सुरू ठेवून जलद गतीने व गुणवत्ता राखून पूर्ण करा. रस्ते खड्डेमुक्त राहावेत याकडे काटेकोर लक्ष द्या.

**२** कुठल्याही परिस्थितीत रस्त्यावर खड्डा चालणार नाही. मॅनहोलवर व गटारांवर झाकणे लावून सुस्थितीत ठेवा. रस्त्यावरील दिवाबत्ती सुव्यवस्थित राहील व विद्युत खांबामुळे कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची खबरदारी घ्या.

**३** उघड्या केबल असू नयेत. डीपीची झाकणे बंद करून घ्या. महानगर गॅस, एमटीएनएल, अदानी इलेक्ट्रिसिटी आदी विविध कंपन्यांनी केलेल्या खोदकामांची माहिती घेऊन ती तातडीने पूर्ण करण्यास आयुक्तांनी सांगितले.

**४** गटार किंवा नाल्याशेजारील, तसेच रस्त्यावरील डेब्रिज उचला. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे साफ ठेवा. बंदिस्त नाले व नैसर्गिक नाले यांची सफाई वेळेत पूर्ण करा. नाले सफाईनंतर किनारी काढून ठेवलेला गाळ थोडासा सुकल्यानंतर लगेच उचला, असे निर्देश आयुक्त काटकर यांनी दिले.

### सिग्नल यंत्रणा कार्यान्वित राहील याकडे लक्ष द्यावे

वाहतूक पोलिस विभागामार्फत प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने पावसाळी काळात सिग्नल यंत्रणा नियमित कार्यान्वित राहील, याकडे लक्ष द्यावे, तसेच स्पीड ब्रेकर, झेब्रा क्रॉसिंगच्या रंगरंगोटीचीही कामे आपापल्या अखत्यारीतील रस्त्यांवर करून घ्यावीत, असे सूचित केले. बांधकामे सुरू असलेल्या इमारतींची माहिती व इमारतीच्या चहूबाजूंनी सुरक्षेच्या दृष्टीने जाळ्या व इतर अपघात प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात.

### पाणीपुरवठा सुरळीत ठेवा

पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे व तो दूषित होणार नाही याची काळजी घ्या. जल शुद्धीकरणाकरिता उपाययोजना करा. मल:निसारण जलवाहिन्या दुरुस्त करून घ्या, असे आयुक्तांनी संबंधितांना सांगितले. शहर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीप्रसंगी आयुक्त काटकर यांनी शहरातील सर्व प्राधिकरणांनी परस्पर समन्वय राखून नियोजन करावे व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी, असे सूचित केले.

# ऑनलाइन गंडा, पोलिसांनी दोघांना मिळवून दिले पैसे

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या सायबर पोलिस ठाण्याने ऑनलाइन फसवणूक झालेल्या दोघांना त्यांची फसवणुकीची रक्कम परत मिळवून दिली आहे.

मीरा रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या रिझवान यांचे पेटीएम खात्याचे व्यवहार होत नसल्याने त्यांनी ऑनलाइन सर्च करून कस्टमर केअरचा मोबाइल क्रमांक दिसला असता त्यावर कॉल केला. संशयित मोबाइलधारकाने रिझवानकडून पेटीएम खात्याची व बँक खात्याची सविस्तर माहिती घेऊन रिझवान यांच्या खात्यांतून एक लाख रुपये लांबवले.

२ मार्च रोजी सायबर पोलिसात तक्रार आल्यावर फसवणुकीची रक्कम आरबीएल बँक खात्यात जमा झाल्याचे समजताच पोलिसांनी रक्कम गोठवून ती परत रिझवान यांना खात्यात मिळवून दिली.

### टेलिग्रामवरील मैत्री महिलेला पडली भारी

**१** मीरा रोड पोलिस ठाणे हद्दीतच राहणाऱ्या समीरा यांना टेलिग्रामवर अनोळखी व्यक्तीशी केलेली मैत्री भारी पडली. त्याने समीरा यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून १ लाख २० हजार रुपये उकळले, परंतु नंतर मात्र त्या अनोळखी व्यक्तीने समीरा यांना पैसे परत केले नाहीत व संपर्क केला नाही.

**२** २० एप्रिल रोजी सायबर पोलिसांकडे तक्रार आल्यानंतर चौकशीत ती रक्कम ॲक्सीस बँकेच्या खात्यात गेली होती. पोलिसांनी पत्रव्यवहार व पाठपुरावा करत रक्कम गोठवून त्यातील १ लाख १८ हजार रुपये समीरा यांना परत मिळवून दिले.

**३** सायबर पो. ठाण्याचे निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, स.निरीक्षक स्वप्नील वाव्हळ, उपनिरीक्षक प्रसाद शेनोलकरसह अमीना पठाण, सुवर्णा माळी, माधुरी धिंडे, राहुल बन आदींनी रक्कम मिळवून दिली.

CamScanner

लोकमत ५.५.३

# हत्येच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला अंधेरीतून अटक

## नालासोपारा गुन्हे प्रकटीकरण शाखेचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मस्जिदमधील ट्रस्टच्या वादातून सोपारा गावातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाची चॉपरने हत्या करून १५ महिन्यांपासून फरार आरोपीला नालासोपाऱ्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अंधेरीतून शुक्रवारी रात्री अटक केली.

टाकीपाड्यात असलेल्या सुन्नी गौसिया मस्जिद ट्रस्टच्या ट्रस्टींमध्ये वाद होता. हा वाद ३० जानेवारी २०२३ रोजी सकाळी नालासोपारा पोलिस ठाण्यात गेला होता. पोलिसांनी दोन्ही विरोधकांना कागदपत्रे, पुरावे सादर करण्यास सांगितले होते. संध्याकाळी बांधकाम व्यावसायिक मुस्सवीर मोहम्मद डायर उर्फ मुच्छू आणि त्यांच्याबरोबर असलेले नागरिक नमाज पढण्यासाठी जातो, असे सांगून पोलिस ठाण्यातून बाहेर पडले. त्याच रात्री आठच्या सुमारास रौफ अब्दुला शेख, बांधकाम व्यावसायिक मुस्सवीर मोहम्मद डायर उर्फ मुच्छू, सिद्दिक पुंजाणी, रफीक मन्सुरी हे या मशिदीत नमाज पढण्यासाठी गेले होते.

मोहम्मद इब्राद इसराईल खान (३१), मोहम्मद अबरार खान (३८), मोहम्मद इम्तियाज इसराईल खान (३६), अतहर खान (२८), इम्रान युसूफ शेख आणि मोहम्मद सुफियान युसूफ शेख यांनी रौफ अब्दुला शेख आणि मुस्सवीर डायर यांच्याशी वाद घातला.

### १५ वर्षांपासून होता फरार

- शेख आणि डायर यांनी जाब विचारल्यावर संतप्त इरशाद खान याने आपल्याजवळील चॉपरने मुस्सवीर उर्फ मुच्छूभाई यांच्या पोटामध्ये मारुन गंभीररीत्या जखमी केले होते.
- **या हल्ल्यात डायर गंभीर जखमी झाल्यामुळे त्यांना सोपारातील वाणी हॉस्पिटलमध्ये व नंतर त्यांची प्रकृती गंभीर झाल्यामुळे रुग्णालयात दाखल केले होते. तिथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता.**
- या प्रकरणी नालासोपारा पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली होती, तर मोहम्मद सुफियान युसूफ शेख हा फरार होता. पोलिसांना त्याची माहिती मिळाल्यावर सापळा रचून अंधेरीतून शुक्रवारी रात्री अटक केली आहे.

> मस्जिदमधील ट्रस्टींवरुन वाद होता. यातील पाच आरोपींना आधीच अटक करण्यात आली होती. यातील फरार एका आरोपीला अंधेरीतून शुक्रवारी रात्री अटक केली आहे. शनिवारी वसई न्यायालयात आरोपीला हजर केले असता, ३ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.
>
> **- विजयसिंग बागल,** वरिष्ठ पोलिस निरीक्षक, नालासोपारा पोलिस ठाणे

पुढारी ५.५.१.

## विजेच्या धक्क्याने रंगारीचा मृत्यू

**पालघर :** विजेचा धक्का लागून ४१ वर्षीय सादिक अली सय्यद यांचा मृत्यू झाल्याची घटना वसई पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. किल्ला बंदर येथे ते रंगारी म्हणून काम करत असताना बांबूच्या परांची लगत असलेल्या विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने त्यांना झटका बसला व ते खाली कोसळले. डोक्याला मार लागून रक्तस्राव झाल्याने त्यांना मनपा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तेथे डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## मोलकरणीने लाखोंचे दागिने लांबवले

**पालघर :** घर काम करणाऱ्या मोलकरणीने तीन लाख ६० हजाराच्या जवळपासचे दागिने चोरून नेल्याची घटना आचोळे पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. रश्मी हाईट्स या इमारतीत राहणाऱ्या अंजू सिंग यांच्या घरी त्यांच्या मोलकरणीने सहा एप्रिल रोजी चोरी केल्याची घटना घडली सिंग यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुरुवारी पोलीस ठाण्यात चोरीच्या गुन्ह्याची नोंद पोलिसांनी केली आहे.

## गटारात पडून वृद्धाचा मृत्यू

**पालघर :** माणिकपूर पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये एका ७१ वर्षीय वृद्धाचा गटारात पडून मृत्यू झाल्याची घटना २४ एप्रिलला घडली. दिवाण बाजारपेठेच्या समोरील गटारात नारायण बोंडे हे तोल जाऊन पडले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी मद्यप्राशन केल्याचे बाब समोर येत आहे. माणिकपूर पोलिसांनी याप्रकरणी गुरुवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

## सात लाखांची घरफोडी

**पालघर :** विरार पोलीस ठाणे क्षेत्रामध्ये घरफोडी करून सात लाख साठ हजाराच्या जवळपासचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे. डोंगरपाडा भागात सौरभ चौधरी यांच्या बंगल्यात ही चोरी झाली असून ती २४ एप्रिल ला रात्रीच्या सुमारास झाली आहे. घराच्या दुसऱ्या मजल्याच्या गॅलरीचा दरवाजा तोडून चोरांनी आत प्रवेश केला व त्यांनी ही चोरी केली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे.

## गांजासह एक जण ताब्यात

**पालघर :** नालासोपाराच्या गुन्हे प्रगटीकरण शाखेने गांजासह एका व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. एक किलो ५०० ग्राम वजनाचा ४५ हजार रुपये किमतीचा गांजा भूपेंद्र मकवाना याच्याकडून पोलिसांनी हस्तगत केला आहे. तर गांजा व इतर साहित्य मिळून ५६ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी मकवाना याच्याकडून जप्त केला. पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

सकाळ ५.५.२.

# अनधिकृत बांधकामांवर कारवाई

## वसई-विरार पालिकेकडून व्यावसायिकांना दणका

विरार, ता. २७ (बातमीदार) : वसई-विरार महापालिकेच्या प्रभाग समिती 'जी' अंतर्गत गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामांवर कारवाई होत असल्या कारणाने माफियांचे धाबे दणाणले आहेत. महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार आणि अतिरिक्त आयुक्त (दक्षिण) संजय हेरवाडे यांच्या आदेशानुसार व उप-आयुक्त (परिमंडळ-१) अजित मुठे (अतिक्रमण विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव अंतर्गत अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली.



विरार : महापालिकेकडून अतिक्रमण हटवण्यात आले.

प्रभाग समिती 'जी' वालीव परिसरातील लक्ष्मी इंडस्ट्रीजमागे अंदाजे पाच हजार चौरस फूट अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले. कामण खिंडीपाडा येथे अंदाजे साडेसहा हजार चौरस फूट अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले. राजावली तलाव येथील चार रूम बांधकामांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेत एकूण १२ हजार ७०० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले व अतिक्रमण हटविण्यात आले.

CamScanner

पुढारी पा. नं.-५.

# मीरारोडमध्ये तरुणीवर बलात्कार, केस कापून केले विद्रुप

## लव्ह जिहादचा प्रकार, नराधमाने लाखो रुपये उकळले

- **मुस्लीम धर्म स्वीकारण्याची सक्ती केल्याची तक्रार**

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा रोडमध्ये राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार करून तिच्यावर मुस्लीम धर्म स्वीकारण्याची सक्ती केल्याचा प्रकार समोर आला आहे. तिची अश्लील छायाचित्रे काढून तिच्याकडून लाखो रुपये उकळण्यात आहे होते. तसेच तिचे केस काढून तिला विद्रुप करण्यात आले होते. याप्रकरणी नया नगर पोलिसांनी ६ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

मिरारोड येथे राहणारी पीडित तरुणी २६ वर्षांची आहे. तरुणी मिरारोड येथे कुटुंबासह राहत असून ती महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. तसेच पीडित तरूणीचे सर्व कुटुंबिय उच्च शिक्षीत आहे. तरुणीने नयानगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार सप्टेंबर २०२३ मध्ये गणपती आगमनाच्या वेळी सोसायटीमध्ये सार्वजनिक गणपती मंडळाने कल्याण येथुन एका ढोल ताशा पथकास गणपती आगमनाच्या मिरवणुसाठी बोलावले होते. त्यावेळी त्या पथकातील मोहसीन शेख याच्याशी त्या तरुणीची ओळख झाली होती. या ओळखीतून त्यांची मैत्री झाली. त्यानंतर मोहसीन शेख याने तरुणीच्या इंस्टाग्रामवर प्रेम करत असल्याचे मेसेज पाठवले. त्यावेळी त्या तरुणीने आपली फक्त मैत्री आहे असे सांगितले.

ऑक्टोबर महिन्यात त्या तरुणीचे आई व भाऊ हे काही दिवसासाठी बाहेर गेले होते. ते मोहसीन याला समजले असता एके दिवशी तो तरुणीच्या घरी बिर्याणी घेऊन आला. त्याने बिर्याणी खायला दिली. त्यामध्ये गुंगीकारक पदार्थ मिसळले होते. यानंतर पीडित तरुणी बेशुद्ध झाल्यानंतर मोहसीन याने तिच्यावर बलात्कार केला आणि तिची अश्लील छायाचित्रे काढली. यानंतर तो अश्लील छायाचित्रे प्रसारित करण्याची धमकी देऊन तिच्याशी वारंवार बळजबरी करून शरीरसंबंध प्रस्थापित करत होता. यानंतर तिला मुस्लिम धर्म स्वीकारण्याची सक्ती करू लागला. तिने नकार दिल्यावर सतत तिला मारहाण करू लागला. तिच्या डोक्यावरील केसही काढून विद्रुप केले होते. तिला ब्लॅकमेल करून तिच्याकडून रोख व सोन्याचे दागिने असे मिळून पावणे तीन लाख रुपये देखील उकळले, तसेच तिला मुंबईतील दोन दर्गामध्ये देखिल नेले. तिथे तिला बुरखा आणून बुरखा घालण्याची सक्ती केली, असा आरोप तिने तक्रारीत केला आहे.

आरोपी मोहसीन शेख याचे भाऊ जाफर, मोबिन, मेव्हणा अश्फाक शेख, यांनी तिचा विनयभंग केला होता. काका इम्रान बागवान याने तिला मारहाण केली. आरोपी मोहसीन याची आई शहनाज हिने देखील मुस्लिम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती करत होते. या तक्रारीवरून नया नगर पोलिसांनी ६ जणांविरोधात फसवणूक, बलात्कार, विनयभंग आणि मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# खून, गॅंगरेपमधील आरोपीला १३ वर्षानंतर अटक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत खून, गॅंगरेप व जबर मारहाण या वेगवेगळ्या ३ गुन्हयातील पाहीजे आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेला १३ वर्षानंतर अटक करण्यात यश आले आहे. धानिवबाग, नालासोपारा पूर्व या ठिकाणी २२ नोव्हेंबर २०१२ रोजी आरोपी यांनी चोर समजुन एका इसमास जबर मारहाण करुन त्यास जिवेठार मारुन त्याची ओळख पटू नये, या उददेशाने नग्न अवस्थेत टाकुन दिले होते. त्या अनुषंगाने वालिव पोलीस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

१० सप्टेंबर २०१५ रोजी २० वर्षे वयाचे तरूण मुलीस रिक्षात बसवून घाटकोपरला नेत असताना रिक्षा चालक व त्याचे इतर साथिदार यांनी संगनमत करून तिला जबरदस्तीने नालासोपारा या ठिकाणी नेवून त्यांनी तिच्यावर सामूहीक बलात्कार केला होता, त्या अनुषगाने निर्मल नगर पोलीस ठाणे , मुंबई शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच ४ ऑगस्ट २०१२ रोजी धानीवबाग, नालासोपारा पुर्व या ठिकाणी यातील फिर्यादीने त्याच्या स्वतःच्या घरात आरोपी यांना न विचारता भाडेकरू ठेवला या कारणावरून आरोपी व त्याचे साथिदार यांनी फिर्यादीस जबर मारहाण करून त्याचे डोक्याला व पायाला गंभीर दुखापत केली होती. त्याअनुषंगाने वालिव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले आहे. या गुन्हयातील आरोपी अक्रम रियासत अली खान ऊर्फ शेख याचा यापूर्वी शोध घेऊन देखील तो गेल्या १३ वर्षापासून मिळून येत नव्हता. त्यामुळे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, अकील सुतार यांनी या गुन्हयाची वालीव पोलीस ठाण्यातुन माहिती घेऊन यातील पाहीजे आरोपी याच्याबाबत सखोल तपास करून माहीती प्राप्त केली. सलग २ महिन्यांपासुन सर्व आवश्यक माहिती प्राप्त केली. सापळा लावुन आरोपी अक्रम रियासत अली खान ऊर्फ शेख (३६) राह. ग्रीन हाईट, शिळफाटा, ठाणे मुळ राह ता. रुधौली, जि. बस्ती, उत्तरप्रदेश याला २५ एप्रिल रोजी ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्याचा ३ गुन्हयात सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. या आरोपीला पुढील कारवाई साठी वालीव पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले.

CamScanner

पुण्यनगरी पु. पा. ६.

# मच्छीप्रेमी, विक्रेत्यांसाठी खुशखबर

## ▮ मीरा-भाईंदर पालिका उभारणार मार्केट ▮ प्रक्रिया सुरू

▮ **मीरा रोड** : मीरा भाईंदर शहरात प्रशस्त मच्छी मार्केट उभारण्याचा महापालिकेचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. हे मच्छी मार्केट भाईंदर पश्चिम भागात उभारण्यात येणार होते. परंतु महापालिकेला भाईंदर पश्चिम भागात मच्छी मार्केट उभारण्यासाठी जागा मिळत नसल्यामुळे महापालिकेने मीरा रोड येथे बाजार उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या मच्छी मार्केटसाठी मीरा रोडच्या एस. के. स्टोन परिसरातील महापालिकेचे आरक्षण क्रमांक ३३३ या जागेची निवड करण्यात आली आहे. जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

मीरा-भाईंदर शहरात मासेमारी करणाऱ्यांची संख्या मोठ्या



प्रमाणात आहे. भाईंदर पश्चिमेच्या व भाईंदर पूर्वेला विस्तीर्ण असा समुद्रकिनारा लाभला आहे. याठिकाणी ८०० पेक्षा जास्त मासेमारी नौका आहेत. मीरा भाईंदरमध्ये मासेमारी व्यवसायातून दरवर्षी कोट्यवधींची उलाढाल होत असते. या परिसरातील मासे शहरासह मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट, वसईतील नायगाव येथे विक्रीस पाठवले जातात. त्यामुळे शहरात प्रशस्त असे मच्छी मार्केट निर्माण करण्याची स्थानिक मच्छीमारांची मागणी करत आहेत. मागणीनुसार पालिकेने केंद्र सरकारच्या पंतप्रधान मत्स्यसंपदा योजनेतून निधी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठवला होता. केंद्र सरकारने मासळी बाजारासाठी १४ कोटी ९६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्यानुसार पालिकेने उत्तन येथील नवी खाडी भागात मच्छी मार्केट उभारण्यासाठी जागा निश्चित केली होती. परंतु ही जागा कांदळवन क्षेत्रात असल्यामुळे अडचणी येत होत्या. मच्छिमारांना सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यासाठी लवकरात लवकर मच्छी मार्केट उभारणे गरजेचे आहे.

पालिकेला भाईंदर पश्चिम येथे दुसरी जागा मिळत नसल्याने हे मच्छी मार्केट आता भाईंदरमध्ये न उभारता मीरा रोड येथे उभारण्याचा निर्णय आयुक्त संजय काटकर यांनी घेतला आहे. यासाठी महापालिकेच्या आरक्षण क्रमांक ३३३ एस. के. स्टोन या जागेची निवड करण्यात आली आहे. या जागेतील काही जागा महापालिकेच्या ताब्यात येणे बाकी आहे. जागा मालकांसोबत जागा हस्तांतराची प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. जागा ताब्यात येताच सुसज्ज असे मच्छी मार्केट या भागात उभारले जाणार असल्याची माहिती पालिकेचे शहर अभियंता दीपक खांबित यांनी दिली आहे.

■ नव्याने उभारण्यात येणारे मच्छी मार्केट हे सुसज्ज असणार आहे. मच्छी मार्केटमध्ये मच्छीमारांना त्यांची मासळी ठेवण्यासाठी शीतगृह (कोल्ड स्टोरेज) उभारण्यात येणार आहे. याशिवाय मासळीची विक्री करण्यासाठी घाऊक बाजारपेठ आणि एक्स्पोर्ट मार्केट अशी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे खांबित यांनी सांगितले.

पुण्यनगरी पु. पा. ७.

# नऊ जणांना महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर

## ▮ मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तलयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

▮ **नालासोपारा** : पोलीस दलात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील नऊ पोलिसांचा सन्मान होणार आहे. भरोसा सेलच्या तेजश्री शिंदे व क्राईम ब्रँचचे अविराज कुऱ्हाडे यांसह सात जणांना पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. यामुळे मीरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

दोन पोलीस निरीक्षक, एक सहाय्यक पोलीस निरीक्षक, तीन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आणि ३ कर्मचाऱ्यांना २०२३ वर्षासाठी पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी २०२३ वर्षातील पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर केले आहेत. ८०० अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हे पदक मिळाले आहे. यात पोलीस आयुक्तालयातील ९ जणांचा समावेश आहे. गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस निरीक्षक अविराज कुऱ्हाडे, सायबरचे पोलीस निरीक्षक सुजीतकुमार गुंजकर, भरोसा सेलच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रेय जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र पाटील, अशोक ईशी, अजय मांडोळे यांच्या नावांचा समावेश आहे. पोलीस हवालदार जयप्रकाश जाधव, आनंद मोरे, मुकेश पवार यांनाही पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाले आहे.



सुजीतकुमार गुंजकर



अविराज कुऱ्हाडे



तेजश्री शिंदे

१ मे रोजी महाराष्ट्र दिनी होणाऱ्या कार्यक्रमात पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांच्या हस्ते पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह प्रदान केले जाणार आहे. तब्बल ९ जणांचा यात समावेश असल्याने मीरा-भाईंदर वसई विरार आयुक्तालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

पुण्यनगरी ५-५-१६.

# फसवणूक झालेली रक्कम मिळाली परत

**मीरा रोड** : काशिगाव पोलीस ठाणे परिसरातील महिलेला वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाइन युट्युब व्हिडिओ लाईक टास्क, ऑनलाइन हॉटेल, मूव्ही रेटिंगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून ७ लाख ३० हजारांची फसवणूक केली होती. ही रक्कम काशिगाव पोलिसांनी तक्रारदाराला परत मिळवून दिली आहे.

काशिगाव पोलीस ठाणे परिसरातील अंकिता पवार (२५) यांची वर्क फ्रॉम होम नावाखाली ऑनलाईन गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ७ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केली होती. त्याअनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत गुन्हा दाखल करून तक्रारदाराच्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली.




त्यानुसार तक्रारदाराची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले. तक्रारदाराची रक्कम गोठवण्याबाबत संबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयित खात्यात रक्कम गोठवण्यात आली. नंतर न्यायालयाकडून तक्रारदाराची रक्कम परत मिळवण्यासाठी काशिमीरा पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदारांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. अखेर तक्रारदाराची फसवणूक झालेली रक्कम त्याच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आली.

म.टा. ५-नो-१०

# नोकरीच्या बहाण्याने शेकडो जणांची फसवणूक

**मिरा-भाईंदर :** परदेशात नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली भाईंदरमधील एका खासगी कंपनीकडून शेकडो जणांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. यात विविध राज्यांतील नागरिकांचा समावेश आहे. याप्रकरणी भाईंदरच्या नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेला रेल्वे स्थानकासमोर असणाऱ्या एका इमारतीत ईगल प्लेसमेंट सर्व्हिसेस नामक कंपनीचे कार्यालय आहे. या कंपनीने परदेशात नोकरी देण्याच्या नावाखाली विविध राज्यांतील शेकडो जणांकडून प्रत्येकी ७० ते ८० हजार रुपये याप्रमाणे कोट्यवधी रुपये उकळले. परदेशात जाण्यासाठी त्यांना विमानाचे तिकीट व व्हिसाही देण्यात आला होता. तर, पासपोर्ट विमानतळावर देण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. त्यानुसार मुंबई विमानतळावर अनेक जण गेले असता, परदेशात जाण्याचे तिकीट रद्द झाले असल्याचे त्यांना कळले. म्हणून त्यांनी कंपनीच्या कार्यालयात संपर्क साधला असता फोन व कार्यालय बंद असल्याचे दिसून आले. यावरून आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच, नोकरीच्या शोधात असणाऱ्या गरजूंनी नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी सायंकाळी गर्दी केली होती. नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

पुण्यनगरी ५-५-१६.

# पिस्तुलाच्या धाकाने व्यापाऱ्याचे अपहरण; आठ जणांविरुद्ध गुन्हा

**नालासोपारा** : वसई न्यू लिंक रोडवरील रश्मी क्लासिक बिल्डिंगमध्ये राहणारे व्यापारी अजित मिश्रा यांचे पिस्तुलाच्या धाकाने अपहरण केले आहे. याप्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजित मिश्रा जूचंद्र येथील ऑफिसमध्ये बसलेले असताना आसिफ शेख, शहबाझ फारुखी, अझर शेख आणि अन्य एक जण त्यांच्या ऑफिसमध्ये शिरले. त्यांनी सीसीटीव्ही आणि डीव्हीआरची केबल काढून पिस्तुलाच्या धाकाने कारमधून मिश्रा यांचे अपहरण केले. त्यांना सिकंदर शेखच्या नालासोपारा येथील बाबा टॉवरमध्ये नेले. तिथे सिकंदरने शिवीगाळ करून एका रद्द करारावर आणि नोटरीवर जबरदस्तीने सह्या करून घेतल्या, असे मिश्रा यांनी सांगितले. रात्री १०.३० पर्यंत त्यांना डांबून ठेवल्यानंतर अजित मिश्रांना सोडून देण्यात आले.



सुटका झाल्यावर मिश्रा यांनी आसिफ, सिकंदर, शहबाझ फारुखी, आरिफ शेख, प्रवीण सिंग, अझर शेख आणि अन्य दोघांविरुद्ध नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकसत्ता ५ नो. ११.

# मीरा रोड येथे तरुणीवर बलात्कार

**वसई :** मीरा रोडमध्ये राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणीने बलात्कार आणि धर्म परिवर्तनासाठी सक्ती करत असल्याची तक्रार केली आहे. या प्रकरणी नया नगर पोलिसांनी ६ जणांविरोधात बलात्कार, फसवणूक आणि मारहाणीच्या कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करून मोहसिन शेख (२२) याला अटक केली आहे. तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार तिची ओळख कल्याण येथे राहणाऱ्या मोहसिनशी झाली. त्याने तिला जेवणातून गुंगीचा पदार्थ देऊन बलात्कार केला.

CamScanner

लोकमत

# हत्येच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला अंधेरीतून अटक

## नालासोपारा गुन्हे प्रकटीकरण शाखेचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मस्जिदमधील ट्रस्टच्या वादातून सोपारा गावातील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाची चॉपरने हत्या करून १५ महिन्यांपासून फरार आरोपीला नालासोपाऱ्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अंधेरीतून शुक्रवारी रात्री अटक केली.

टाकीपाड्यात असलेल्या सुन्नी गौसिया मस्जिद ट्रस्टच्या ट्रस्टींमध्ये वाद होता. हा वाद ३० जानेवारी २०२३ रोजी सकाळी नालासोपारा पोलिस ठाण्यात गेला होता. पोलिसांनी दोन्ही विरोधकांना कागदपत्रे, पुरावे सादर करण्यास सांगितले होते. संध्याकाळी बांधकाम व्यावसायिक मुस्सवीर मोहम्मद डायर उर्फ मुच्छु आणि त्यांच्याबरोबर असलेले नागरिक नमाज पढण्यासाठी जातो, असे सांगून पोलिस ठाण्यातून बाहेर पडले. त्याच रात्री आठच्या सुमारास रौफ अब्दुला शेख, बांधकाम व्यावसायिक मुस्सवीर मोहम्मद डायर उर्फ मुच्छु, सिद्दिक पुंजाणी, रफीक मन्सुरी हे या मशिदीत नमाज पढण्यासाठी गेले होते.

मोहम्मद इब्राद इसराईल खान (३९), मोहम्मद अबरार खान (३८), मोहम्मद इम्तियाज इसराईल खान (३६), अतहर खान (२८), इम्रान युसूफ शेख आणि मोहम्मद सुफियान युसूफ शेख यांनी रौफ अब्दुला शेख आणि मुस्सवीर डायर यांच्याशी वाद घातला.

### १५ वर्षांपासून होता फरार

- शेख आणि डायर यांनी जाब विचारल्यावर संतप्त इरशाद खान याने आपल्याजवळील चॉपरने मुस्सवीर उर्फ मुच्छूभाई यांच्या पोटामध्ये मारून गंभीररीत्या जखमी केले होते.
- या हल्ल्यात डायर गंभीर जखमी झाल्यामुळे त्यांना सोपारातील वाणी हॉस्पिटलमध्ये व नंतर त्यांची प्रकृती गंभीर झाल्यामुळे रुग्णालयात दाखल केले होते. तिथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता.
- या प्रकरणी नालासोपारा पोलिसांनी पाचही आरोपींना अटक केली होती, तर मोहम्मद सुफियान युसूफ शेख हा फरार होता. पोलिसांना त्याची माहिती मिळाल्यावर सापळा रचून अंधेरीतून शुक्रवारी रात्री अटक केली आहे.

---

मस्जिदमधील ट्रस्टींवरून वाद होता. यातील पाच आरोपींना आधीच अटक करण्यात आली होती. यातील फरार एका आरोपीला अंधेरीतून शुक्रवारी रात्री अटक केली आहे. शनिवारी वसई न्यायालयात आरोपीला हजर केले असता, ३ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

- विजयसिंग बागल, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, नालासोपारा पोलिस ठाणे



CamScanner

लोकमत

# विरारच्या गुन्हेगारावर एमपीडीएअंतर्गत कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरार परिसरातील सराईत गुन्हेगारावर लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी शनिवारी दिली आहे.

मिरा भाईंदर - वसई विरार आयुक्तालयातील सराईत गुन्हेगार मस्तान उस्मान शेख याने विरार पोलिस ठाणे हद्दीत व परिसरात गुन्हेगारी व धोकादायक कृत्यांनी दहशत निर्माण केली होती. त्या आधारे परिसरातून तो बांधकाम व्यावसायिक व इतर व्यापाऱ्यांकडून पैसे उकळत होता. इतर साथीदारांसह दहशतीसाठी मारामाऱ्या करणे, महिलांचा विनयभंग करणे, सरकारी नोकरावर हल्ला करून दुखापत करणे, ॲसिड हल्ला करून जबर दुखापत करणे तसेच बेकायदेशीररीत्या शस्त्रे जवळ बाळगून लोकांना धमकावणे, खुनाचा प्रयत्न करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे अपराध केले असून त्याच्याविरुद्ध एकूण सहा गुन्हे दाखल आहेत.




## पहिल्यांदाच अशी कारवाई

१ विरार पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी या गुन्हेगाराचा पूर्व इतिहास व सर्व माहिती संकलित करून एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव पोलिस उपायुक्तांमार्फत सादर केला होता.

२ या प्रस्तावाचे अवलोकन करून ही धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री पटल्याने त्याच्याविरोधात पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्धतेचे आदेश पारित केले आहेत.

३ पोलिस आयुक्तालयामध्ये प्रथमच अशा प्रकारची स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. यापुढे देखील आयुक्तालयामध्ये अशा प्रकारे सराईत गुन्हे करणाऱ्या इसमांविरुद्ध कडक कारवाई केली जाणार आहे.

Hello Vasai
Page No. 1 Apr 28, 2024
Powered by: erelego.com

CS CamScanner

दैनिक
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई,
मुंबई केसरी टाइम्स
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १८ अंक : २० रविवार २८ अप्रैल २०२४ मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 04

# पुलिस अधिकारी - कर्मचारी पुलिस महासंचालक पदक से नवाजे जाएंगे, हुई घोषणा

विरार, ११ पुलिस अधिकारी एवं कर्मचारियों (मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय) को पुलिस महासंचालक पदक की घोषणा की गयी। बातदे कि, पुलिस अधिकारी और कर्मचारियों को सगे संबंधित व दोस्तों द्वारा उन्हें शुभकामनाएं व बधाइयां दी जा रही है।

यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है।पुलिस अधिकारी ने एक प्रेस विज्ञप्ति जारी कर बताया कि,मीरा-भाईंदर,वसई-विरार पुलिस कमिश्नरेट २ पुलिस इंस्पेक्टर, १ महिला सहायक पुलिस इंस्पेक्टर, १ पुलिस सब-इंस्पेक्टर, ३ सहा.पो.उप.इंस्पेक्टर, ३ पुलिस हवालदार और १ पुलिस सिपाही यानी कुल ११ पुलिस अधिकारी और कर्मचारी को महाराष्ट्र दिवस के अवसर पर, उनकी १०-१५ वर्षों की सेवा के दौरान उत्कृष्ट प्रदर्शन के लिए पुलिस महासंचालक ने पुलिस महासंचालक पदक से सम्मानित करने की घोषणा की है।

पुलिस अधिकारी ने 'कहा कि ' पुलिस इंस्पेक्टर-अविराज कुराडे (अविराज कुराडे, गुन्हे शाखा युनिट १),पुलिस इंस्पेक्टर- सुजितकुमार गूंजकर (सायबर पुलिस स्टेशन),महिला सहायक पुलिस इंस्पेक्टर-तेजश्री शिंदे (भरोसा सेल),पुलिस सब-इंस्पेक्टर-दत्तात्रेय जाधव (पुलिस उपायुक्त परिमंडल२), सहा.पो.उप.इंस्पेक्टर-रामचंद्र पाटील (अ.नै.मा.वा.शाखा),सहा.पो.उप.इंस्पेक्टर-अशोक ईशी (अ.पो.आ.कार्यालय एमबीवीवी),सहा.पो.उप.इंस्पेक्टर-अजय मांडोले (पुलिस उपायुक्त परि मंडल १),पुलिस हवा.-जयप्रकाश जाधव(वालीव पुलिस स्टेशन),पुलिस हवा.-आनंद मोरे (पुलिस उपायुक्त परि. मंडल १),पुलिस हवा.-मुकेश पोरे (तुलिंज पुलिस स्टेशन ) और पुलिस सिपाही-नामदेव ईश्वलकर (पुलिस मुख्यालय) की पुलिस महासंचालक पदक की घोषणा हुई है।पुलिस अधिकारी ने कहा कि,मीरा-भाईंदर,वसई-विरार पुलिस आयुक्तालय उपरोक्त पुलिस अधिकारी और कर्मचारियों को बधाई देता है।

साथ ही उन्हें १ मई २०२४ को पुलिस आयुक्त मधुकर पांडे द्वारा पुलिस महासंचालक पदक से सम्मानित किया जाएगा।

CS CamScanner

दैनिक यशोभूमि

# वपुनि कुराडे सहित 11 पुलिसकर्मियों को मिलेगा पुरस्कार

**यशोभूमि / प्रतिनिधि**

**मीरा रोड ।** मीरा-भाईंदर वसई-विरार पुलिस आयुक्तालय के 2 वरिष्ठ पुलिस निरीक्षकों सहित कुल 11 पुलिसकर्मियों को उनकी उत्कृष्ट सेवा के लिए महाराष्ट्र पुलिस के प्रतिष्ठित पुरस्कारों में से एक डीजी इन्सिग्निया'( डी. जी. प्रतीक चिन्ह पदक ) पुरस्कार से सम्मानित किया जाएगा। ये पदक 1 मई को 'महाराष्ट्र दिवस' पर प्रदान दिए जाएंगे। ज्ञात हो कि डीजी प्रतीक चिन्ह पदक सिर्फ उन काबिल पुलिसकर्मियों को ही

### 'महाराष्ट्र दिवस' पर प्रदान किए जाएंगे पदक

दिया जाता है जिन्होंने 15 साल से अधिक समय तक पुलिस बल में योगदान दिया है, साथ ही उनका सर्विस रिकॉर्ड भी साफ-सुथरा रहा है। पुरस्कार पाने वालों में क्राइम



ब्रांच ( यूनिट 1 ) के वरिष्ठ पुलिस निरीक्षक अविराज कुराडे, सुजीत गुंजकर ( सायबर सेल ), सहित सहायक पुलिस निरीक्षक ( भरोसा सेल-मी.भा ) तेजश्री शिंदे, दत्तात्रय जाधव ( परि-2 वसई ) और सहायक पुलिस उपनिरीक्षक अजय मांडोले, रामचंद्र पाटिल, अशोक ईंशी सहित हवलदार आनंद मोरे, जयप्रकाश जाधव (वालीव), मुकेश पोरे ( तुलिंज ) के साथ सिपाही नामदेव ईश्वलकर शामिल हैं।

CS CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 27 अंक-309 मुंबई, रविवार 28 अप्रैल 2024 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# 1 मई को 11 पुलिस अधिकारी- कर्मचारी होंगे पुलिस महासंचालक पदक से सम्मानित

**वसई:** 11 पुलिस अधिकारी एवं कर्मचारियों (मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय) को पुलिस महासंचालक पदक की घोषणा की गयी। बातदे कि, पुलिस अधिकारी और कर्मचारियों को सगे संबंधित व दोस्तों द्वारा उन्हें शुभकामनाएं व बधाइयां दी जा रही है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है।पुलिस अधिकारी ने एक प्रेस विज्ञप्ति जारी कर बताया कि, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस कमिश्नरेट 2 पुलिस इंस्पेक्टर, 1 महिला सहायक पुलिस इंस्पेक्टर, 1 पुलिस सब-इंस्पेक्टर, 3 सहा.पो.उप.इंस्पेक्टर, 3 पुलिस हवालदार और 1 पुलिस सिपाही यानी कुल 11 पुलिस अधिकारी और कर्मचारी को महाराष्ट्र दिवस के अवसर पर, उनकी 10-15 वर्षों की सेवा के दौरान उत्कृष्ट प्रदर्शन के लिए पुलिस महासंचालक ने पुलिस महासंचालक पदक से सम्मानित करने की घोषणा की है। पुलिस अधिकारी ने 'कहा कि ' पुलिस इंस्पेक्टर-अविराज कुराडे (अविराज कुराडे, गुन्हे शाखा युनिट 1), पुलिस इंस्पेक्टर-सुजितकुमार गूंजकर (सायबर पुलिस



स्टेशन), महिला सहायक पुलिस इंस्पेक्टर-तेजश्री शिंदे (भरोसा सेल), पुलिस सब-इंस्पेक्टर-दत्तात्रेय जाधव (पुलिस उपायुक्त परि. मंडल 2), सहा.पो.उप.इंस्पेक्टर-रामचंद्र पाटील (अ. नै. मा. वा. शाखा), सहा. पो. उप. इंस्पेक्टर-अशोक ईशी (अ. पो. आ. कार्यालय एमबीवीवी), सहा.पो.उप.इंस्पेक्टर-अजय मांडोले (पुलिस उपायुक्त परि मंडल 1), पुलिस हवा.-जयप्रकाश जाधव (वालीव पुलिस स्टेशन), पुलिस हवा.-आनंद मोरे (पुलिस उपायुक्त परि. मंडल 1), पुलिस हवा.-मुकेश पोरे (तुलिंज पुलिस स्टेशन ) और पुलिस सिपाही-नामदेव ईश्वलकर (पुलिस मुख्यालय) की पुलिस महासंचालक पदक की घोषणा हुई है।पुलिस अधिकारी ने कहा कि, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय उपरोक्त पुलिस अधिकारी और कर्मचारियों को बधाई देता है। साथ ही उन्हें 1 मई 2024 को पुलिस आयुक्त मधुकर पांडे द्वारा पुलिस महासंचालक पदक से सम्मानित किया जाएगा।

CamScanner